# अर्थशास्त्र

## बी.ए. तृतीय वर्ष (सेमिस्टर VI)

- डॉ. प्रज्ञा बागडे

## खुला व्यापार

## (Free Trade)

कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासात विदेशी व्यापाराला महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. आर्थिक विकासाचे साधन म्हणून विदेशी व्यापाराकडे बघण्याचा दृष्टीकोन व्यापारवाद्यांपासून तर आधुनिक अर्थशास्त्रज्ञांपर्यंत स्विकारलेला दिसून येतो. विकासाचे एक साधन म्हणून विदेशी व्यापाराकडे बघण्याचा दृष्टीकोन सर्वमान्य असला तरी विदेशी व्यापाराबाबत स्विकारावयाच्या धोरणाबाबत मात्र अर्थशास्त्रज्ञांमध्ये तीव्र स्वरुपाचे मतभेद दिसून येतात.

जगाच्या उत्पन्नात जास्तीत जास्त वाढ करणे आणि आंतरराष्ट्रीय व्यापारात सहभागी देशांना जास्तीत जास्त फायदे मिळावेत असे मत एल्सवर्थ, विनर, हॅबर्लर, जॉन्सन इत्यादींनी खुला व्यापार (मुक्त व्यापार) चांगला असा युक्तीवाद मांडला.

## खुला व्यापार (मुक्त व्यापार)

**(Free Trade)**

देशी व्यापाराप्रमाणे विदेशी व्यापार मुक्त वातावरणात होत असेल, त्यावर कोणतेही निर्बंध किंवा नियंत्रणे बसविल्या जात नसेल, विदेशी वस्तू व देशी वस्तू या भेद केल्याजात नसेल तर त्या व्यापारविषयक धोरणाला खुल्या व्यापाराचे धोरण असे म्हणतात.

**ॲडम स्मिथची व्याख्या** "मुक्त व्यापार म्हणजे असे धोरण की ज्यानुसार स्वदेशी वस्तू व विदेशी वस्तू यात भेद करण्यात येत नाही, म्हणून विदेशी वस्तूंवर अधिक भार पाडण्यात येत नाही आणि स्वदेशी वस्तूला विशेष झुकते माप देण्यात येत नाही."

**पॉल सेमुएल्सन (Paul Samuelson) यांच्या मते,** ज्या व्यापारात कोणताही बाह्य हस्तक्षेप किंवा एकाधिकार नसतो आणि अनिश्चितता व अविभाज्यता यांचा अभाव असतो, त्या व्यापाराला आपण खुला व्यापार संबोधू शकतो.

## खुल्या व्यापाराच्या (मुक्त व्यापाराच्या) समर्थनार्थ मुद्दे

खुल्या व्यापाराचे समर्थन करण्यासाठी खालील मुद्दे मांडले जातात.

**१) महत्तम सामाजिक उत्पादन**

**पॉल सेमुएल्सन यांच्या मते,** "निर्बंधरहित व्यापार परस्पर लाभदायक आंतरराष्ट्रीय श्रम विभाजन प्रोत्साहित करतो प्रत्येक देशात वास्तविक उत्पादन वाढते व त्यामुळे संपूर्ण जगात जीवनमानाची पातळी वाढते."

**हॅबरलर म्हणतात,** "सामाजिक उत्पादनातील वाढ मुक्त व्यापाराच्या बाजूने प्रमुख तर्क होय."

**२) राष्ट्रीय उत्पन्नात वाढ**

मुक्त व्यापारामुळे प्रत्येक देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते. कारण प्रत्येक देश आपल्या उपलब्ध नैसर्गिक साधन संपत्तीचा मुक्त वापर करु शकतो. तसेच देशात ज्या वस्तूंच्या उत्पादनासाठी अनुकूल परिस्थिती आहे अशा वस्तूचे उत्पादन प्रत्येक देश करु शकतो.

### ३) एकाधिकाऱ्यावर प्रतिबंध

मुक्त व्यापार म्हणजे मोकळी किंवा खुली स्पर्धा होय. त्यामुळे मुक्त व्यापारात एकाधिकाराच्या विकासाला पायबंद बसतो.

### ४) आंतरराष्ट्रीय सहकार्यात वाढ

खुल्या व्यापारामुळे आंतरराष्ट्रीय क्षेत्रात परस्पर सहयोगाची भावना निर्माण होते. प्रा. हॅबर्लर म्हणतात, "मुक्त व्यापारामुळे केवळ देशाच्या उत्पादकतेत वाढ होत नसून विश्वबंधुत्व, आंतरराष्ट्रीय सहयोग व सद्भावना वाढविण्याचे महत्वाचे शैक्षणिक कार्य होय"

### ५) बाजारपेठांचा विस्तार

मुक्त व्यापार धोरणामुळे श्रम विभागणी आणि विशेषीकरणाच्या वापरामुळे बाजारपेठांच्या कक्षा रुंदावतात. जेव्हा व्यापारावर बंधने येतात तेव्हा विशेषीकरण कमी होते. त्यामुळे उत्पन्न कमी होऊन रोजगार कमी होतो.

### ६) उत्पादन तंत्रात सुधारणा

मुक्त व्यापारात तीव्र स्पर्धा असल्यामुळे उद्योगपतींना व व्यापाऱ्यांना चांगल्या दर्जाच्या वस्तू कमी किमतीला विकाव्या लागतात. त्यामुळे त्यांचा उत्पादन तंत्रात सुधारणा करण्याचा प्रयत्न असतो. आधुनिक उत्पादन तंत्राचा वापर करुन तीव्र स्पर्धेत टिकाव धरावयाचा असतो.

### ७) सुवर्णमान व्यवस्थेला अनुकूल

कोणतीही आंतरराष्ट्रीय मुद्रा प्रणाली यशस्वी होण्याकरिता चलनाच्या खरेदी-विक्रीवर कोणत्याही प्रकारची नियंत्रणे नकोत. खुला/मुक्त व्यापार हा सुवर्णमान पद्धतीला अनुकूल असतो.

### ८) राजनैतिक भ्रष्टाचार नियंत्रण

सरंक्षणवादामुळे आपपरभाव, पक्षपात व भ्रष्टाचार ह्यांना ज्याप्रमाणे वाव मिळतो तसा खुल्या व्यापारात मिळत नाही.

### ९) विदेशी देणी फेडण्याची सोय

मुक्त व्यापाराच्या स्थितीत देशाची आयात-निर्यात मुक्तपणे होत असते. आयातीची देणी निर्यातीद्वारे फेडली जातात. त्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्याची गरज नसते.

### १०) उपभोक्त्यांना लाभ

खुल्या व्यापारात आयात व निर्यात यांच्यात जकाती नसल्यामुळे त्यांचे परिणाम बरेच अधिक राहते. देशात वस्तूंच्या किमती कमी होतात व त्यामुळे उपभोक्त्याला लाभ मिळतो.

### ११) औद्योगिक विकासाला चालना

देशाच्या औद्योगिकरणासाठी कच्चा माल, यंत्रसामुग्री, आधुनिक तंत्रज्ञान इत्यादींची आवश्यकता असते. या बाबी जर देशात उपलब्ध नसतील तर त्यांची विदेशातून आयात करावी लागते. त्याचप्रमाणे उद्योगधंद्यात तयार होणाऱ्या पक्क्या मालाला पुरेशी मागणी असावी लागते. त्यासाठी विदेशात वस्तूंची निर्यात व्हावी लागते. देशाच्या आयात व

निर्याती निर्बंधरहित असतील तर देशाच्या औद्योगिक विकासाला चालना मिळून औद्योगिक विकासात वाढ होईल.

### १२) दळणवळण व वाहतुकीच्या साधनांचा विकास

खुल्या/मुक्त व्यापारामुळे मोठ्या प्रमाणात रस्ते, रेल्वे, हवाई वाहतूक इत्यादी सुविधांच्या विकासामुळे आर्थिक विकास जलद गतीने होतो.

## खुल्या व्यापाराच्या विरोधातील मुद्दे

खुल्या व्यापाराचे धोरण सर्व परिस्थितीत व सर्व राष्ट्रांना योग्य ठरते असे नव्हे तर काही देशांना ते विधायक देखील ठरु शकतात. त्यामुळेच सरंक्षण धोरणाच्या समर्थकांनी मुक्त व्यापाराच्या विरोधात पुढील मुद्दे मांडले.

### १) अविकसित देशांसाठी असमर्थनीय

मुक्त व्यापारामध्ये विकसित देश नेहमीच अविकसित देशांची पिळवणूक करण्याचा प्रयत्न करतात. अविकसित राष्ट्र व विकसित राष्ट्र यांच्यातील स्पर्धा अविकसित राष्ट्रांना घातक ठरते. विकसित राष्ट्रांचा विकास हा झालेला असतो परंतु अविकसित राष्ट्रांचे विकासाचे प्रश्न सुटलेले नसतात. त्यामुळे विकसित राष्ट्रांच्या स्पर्धेला तोंड देण्याचे बळ अविकसित राष्ट्रात नसते. त्यामुळेच खुला व्यापार अविकसित देशांसाठी असमर्थनीय असतो.

### २) देशाचा असंतुलित विकास

मुक्त व्यापारामुळे सर्व क्षेत्रे विकसित होत नाही तर केवळ औद्योगिक क्षेत्रच विकसित होते. औद्योगिक क्षेत्रातही प्रामुख्याने निर्यात वस्तूंचे उद्योग प्रगती करतात. त्यामुळे देशाच्या विकासात असंतुलन निर्माण होते.

### ३) नैसर्गिक साधनांचा अपव्यय

मुक्त व्यापारामुळे नैसर्गिक साधनांचा अपव्यय होतो. ही साधने देशाच्या विकासासाठी उपयोगात न येता त्यांची विदेशात मोठ्या प्रमाणात निर्यात केली जाते. खनिजांच्या बाबतीत हा अपव्यय मोठ्या प्रमाणात होतो.

### ४) राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मक्तेदारी

प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ प्रा. हॅबर्लर यांनी असे मत व्यक्त केले आहे की, सर्वसाधारणपणे मुक्त व्यापार धोरणामुळे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मक्तेदारी अस्तित्वात येते. आंतरराष्ट्रीय मक्तेदारीचा कल देशांतर्गत उद्योगांच्या विकासात अडथळा आणण्याकडे असतो. मक्तेदारीमुळे समाजाची पिळवणूक होते आणि समाजाच्या कल्याणाला हानी पोहोचते.

### ५) चैनीच्या वस्तूंची अनावश्यक आयात

खुल्या व्यापाराच्या अंतर्गत वस्तूच्या आयाती निर्यातीवर बंधने घातली जात नाही. अन्नधान्य, कापड, यंत्रसामुग्री, रसायने, अवजारे इत्यादींची आयात करणे आवश्यक असते. परंतु बऱ्याचदा आवश्यक वस्तूंऐवजी चैनीच्या वस्तूंचीच मोठ्या प्रमाणात आयात केली जाते.

### ६) खुला व्यापार युद्ध काळात अत्यंत घातक

मुक्त व्यापारामुळे बऱ्याच वस्तूंची विदेशातून आयात होत असते. शांततेच्या काळात हे परावलंबन व परस्परावलबंन कितीही उपयुक्त असले तरी युद्ध काळात अत्यंत धोक्याचे असते. कारण युद्ध काळात विशिष्ट देशातून होणारी आयात बंद होते त्यामुळे आवश्यक मालाचा व युद्ध सामुग्रीचा तुटवडा पडून देशाचे स्वातंत्र्य धोक्यात येते.

### ७) राष्ट्रीय हिताला मारक

खुल्या व्यापरामुळे स्वस्त व चांगल्या दर्जाच्या मालाची मुक्तपणे आयात होऊ लागते. विकसित देशातील ह्या वस्तूंच्या स्पर्धेत अविकसित देशातील वस्तू टिकाव धरु शकत नाही. त्यामुळे स्वदेशी उत्पादन घटते. उद्योगधंदे बंद पडतात, बेकारीत वाढ होऊन अर्थव्यवस्था विस्कळीत होते.

### ८) सरकारी उत्पन्नाच्या दृष्टीने निरुपयोगी

मुक्त व्यापाराच्या अंतर्गत वस्तूंवरील आयातींवर कोणत्याही प्रकारचे निर्बंध लादले जात नाही. देशात कोट्यावधी रुपयांची आयात होऊनही सरकारी उत्पन्नाच्या दृष्टीने कोणत्याही उपयोगाची नसते. कारण त्यामुळे सरकारी तिजोरीत कोणत्याही प्रकारची भर पडत नाही.

### ९) मुलभूत उद्योगांच्या विकासात अडचणी

कोणत्याही देशाचा भावी विकास हा त्या देशातील मुलभूत उद्योगांच्या विकासावर अवलंबून असतो. मुक्त व्यापारामुळे मुलभूत उद्योगांच्या विकासात अडचणी निर्माण होतात. अशा उद्योगांचा विकास विकसित राष्ट्रांतच होतो. अविकसित देश त्यापासून वंचित राहतात व त्यांच्या भावी विकासात अडथळे निर्माण होतात.

# व्यापारी करार

## (Trade Agreements)

आधुनिक काळात आंतरराष्ट्रीय व्यापार व आंतरराष्ट्रीय आर्थिक संबंधाचा विकास व विस्तार होत असतांना विविध देशांमध्ये होणारे व्यापारी करार हे महत्वाचे ठरतात. या व्यापारी कराराचे दोन प्रकार करण्यात येतात.

१) सर्वाधिक पसंती राष्ट्र कलम        २) प्रशुल्क करार

ह्या ठिकाणी सर्वाधिक पसंती राष्ट्र कलमाचा विचार करावयाचा आहे.

### १) सर्वाधिक पसंती राष्ट्र कलम

**(Most Favoured Nation Clause)**

यालाच अतिअनुग्रही राष्ट्रखंड असेही म्हणतात. गॅट (GATT) ही बहुपक्षीय करार संघटना आहे. या संघटनेचे सर्व सदस्य एकाच कराराने परस्परांशी बांधलेले असतात. समान वागणूक व समान नियम सगळ्यांना द्यावी लागतात. भेदभाव करणाऱ्या देशांवर बंधने येतात. ह्या 'भेदभावरहित' धोरणाला सर्वाधिक पसंती राष्ट्रे (स.प.रा.) कलम म्हणतात. सर्वाधिक पसंती राष्ट्र याचा अर्थ ज्याला सर्वात जास्त पसंती दाखविली जाते असा देश होत नाही. हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे. कोणत्याही देशाला जी पसंती दिली जाते तीच या देशालाही मिळेल असा होतो.

**सर्वाधिक पसंती राष्ट्र कलमाचे तीन प्रकार केले जातात.**

### अ) सशर्त व बिनशर्त स.प.रा. कलम

करारात स.प.रा. कलमाचा समावेश केला असल्यास कोणताही अ देश दुसऱ्या ब देशाला त्याच सवलती देण्याचे अभिवचन देतो. ज्या त्याने अगोदरच तिसऱ्या एखाद्या क

देशाला दिल्या असतील परंतु अट ही असते की दुसऱ्या ब देशाने त्या अगोदर कोणत्याही अन्य ड देशाला दिल्या असतील त्या सर्व सवलती अ देशाला दिल्या पाहिजे. करारात 'बिनशर्त स.प.रा. कलमाचा समावेश असल्यास' अशा सर्व सवलती आपोआप आणि करार अमलात आल्याबरोबर तत्काळ दोन्ही देशांना लागू होते. 'अ' देशाने 'क' देशाला दिलेल्या सवलती 'ब' देशाला आपोआप मिळू लागतात. तसेच 'ब' ने 'ड' देशाला दिलेल्या सवलती 'अ' देशाला आपोआप मिळू लागतात.

सशर्त स.प.रा. कलमामुळे मर्यादित सरंक्षण मिळते. याउलट बिनशर्त स.प.रा. कलमाचा समावेश द्विपक्षीय करारात असल्यास कोणतेही राष्ट्र सर्वाधिक पसंती ठरत नाही जी वागणूक व सवलत सवार्धिक पसंती राष्ट्राला मिळते तीच सर्व राष्ट्रांना मिळते. कोणतेही एक राष्ट्र सर्वाधिक पसंतीचे ठरत नाही. हे या बिनशर्त स.प.रा. कलमाचे वैशिष्ट्य आहे. या कलमामुळे राष्ट्रांना भेदभावपूर्ण वागणूकीपासून सरंक्षण मिळते. म्हणून या कलमात समान वागणूक कलम म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

### ब) एकपक्षीय आणि बहुपक्षीय स.प.रा. कलम

स.प.रा. कलमाचे स्वरुप सामान्यत: द्विपक्षीय किंवा बहुपक्षीय असेच असते. परंतु काही अपवादात्मक स्थितीत विशेषत: युद्ध काळात ते एकपक्षीय देखील असू शकते. उदा. महायुद्धानंतर झालेल्या वॉर्सा करारानुसार (Warsaw Pact) जर्मनी या विजयी राष्ट्राने विजयी झालेल्या मित्र राष्ट्रांना अति अनुग्रहीत राष्ट्र म्हणून वागणूक दिली पाहिजे असे ठरले होते. मित्र राष्ट्रांनी मात्र जर्मनीला स.प.रा. म्हणून वागणूक देण्याचे कोणतेच बंधन स्विकारले नव्हते.

### क) निर्बंधित व अनिर्बंधित स.प.रा. कलम

या कलमाचा उपयोग केवळ काही विषय, काही देश आणि काही वस्तू यांच्यापर्यंत मर्यादित ठेवल्यास त्याला निर्बंधित स.प.रा. करार म्हणतात. मात्र सर्व विषय, सर्व देश आणि सर्व वस्तू यांचा समावेश कराराअंतर्गत होत असल्यास त्यास अनिर्बंधित स.प.रा. करार म्हणतात.

बिनशर्त आणि अनिर्बंधी अशा स.प.रा. कलमाचा समावेश असलेले करार जितक्या जास्त प्रमाणात होतात त्या प्रमाणात भेदभाव विरहित व्यापाराला चालना मिळते व त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार वाढण्यास मदत होते.

## सर्वाधिक पसंती राष्ट्र धोरणाचे फायदे

१) पक्षपात नसलेल्या वागणुकीच्या अश्वासनामुळे राष्ट्रा-राष्ट्रांमध्ये शांती व सद्भावना ठेवण्यास मदत होते.

२) लहान देशांच्या दृष्टीने हे धोरण लाभदायक ठरते. समान वागणुकीमुळे लहान राष्ट्रांना फायदा होते.

३) जगातील कोणत्याही देशातून होणाऱ्या आयातीवर एक समान दरानेच प्रशुल्क लावण्यात येईल.

४) बिनशर्त स.प.रा. व्यवहार हे प्रशुल्क कराराशी विसंगत नाही हे व्यवहार प्रशुल्क कराराप्रमाणे लाभ देतात.

## सर्वाधिक पसंती राष्ट्र धोरणाचे तोटे

१) सर्वाधिक पसंती राष्ट्र धोरण हे अन्यायकारक आहे असा आक्षेप घेण्यात येतो.

२) जेव्हा सरंक्षण धोरणाचा अवलंब करण्यात येतो तेव्हा ह्या व्यवहाराअंतर्गत प्रशुल्कात

घट शक्य नसते.

३) स.प.रा. कलमाच्या साहय्याने एका देशाला सर्व आवश्यक सवलती प्राप्त होतात किंवा नाही या बद्दल खात्री नसते.

४) ज्या देशाला स.प.रा. कलमाखाली अप्रत्यक्षपणे सवलती मिळतात तो अडचणीत येऊ शकतो कारण अशा सवलती सदोदीत मिळण्याची शास्वती नसते.

# अपेक्षित प्रश्न

## दिर्घोत्तरी प्रश्न

१) मुक्त व्यापाराची संकल्पना स्पष्ट करुन त्याच्या समर्थनार्थ मुद्दे सांगा.

२) मुक्त व्यापाराची संकल्पना स्पष्ट करुन त्याच्या (खंडनार्थ) विरोधी मुद्दे सांगा.

## लघुत्तरी प्रश्न

१) सर्वाधिक पसंती राष्ट्र कलमाचे तीन प्रकार सांगा.

२) सर्वाधिक पसंती राष्ट्र कलमाचे फायदे सांगा.

३) सर्वाधिक पसंती राष्ट्र कलमाचे तोटे सांगा.